Estd: 1962

NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## -: परिपत्रक :-

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, दि.१ जुलै, २०१८ रोजी कृषी दिन व वन महोत्सव साजरा करण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ व सामाजिक वनीकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सिंथेटिक ट्रॅक परिसरात मा.नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील, मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालकमंत्री कोल्हापूर यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ सकाळी १०.४५ वाजता करण्यात येणार आहे. तसेच मा.कुलगुरू प्रा.डॉ.देवानंद शिंदे, मा.प्र-कुलगुरू प्रा.डॉ.डी.टी.शिर्के यांच्या हस्ते सकाळी ११.०० वाजता आर.ओ.प्लांटजवळ कुलगुरू उद्यानअंतर्गत वृक्षारोपण होणार आहे.

तरी सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी यांनी उपस्थित रहावे. सदरचे परिपत्रक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

जा.क्र. शिवाजी वि/उद्यान विभाग/ 90

दिनांक: ३०/०६/२०१८

प्रत:
१. मा.अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.
२. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/कायदा अधिकारी/जनसंपर्क अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख
४. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.(इंट्रानेट)
६. सुरक्षा विभाग- उपरोक्त नियोजनानुसार सिंथेटीक ट्रॅकजवळील प्रवेशद्वार खुले करणे, बंद करणे व इतर आवश्यक नियोजनास्तव.

D/mydoc/Sadar 629